


Scanned by CamScanner

## ।। श्री सत्यनारायणाची कथा ।।

### ।। अध्याय पहिला ।।

आता श्रीसत्यनारायणाच्या कथेला आरंभ होत आहे श्रीगजाननाला नमस्कार असो एकदा नैमिषारण्यात शौनक वगैरे मुनींनी सुताला विचारीले मुनिश्रेष्ठा मनातील सर्व फले कोणत्या व्रताने मिळतात ते आम्हाला सांगा त्यावर सूत सांगतात पुर्वी नारदाने हाचप्रश्न श्रीविष्णुला विचारला होता तीकथा सांगतो एकदा नारदमुनी पृथ्वीवर हिंडत असता तेथे अनंत जन्म घेउन सर्वजन खूप दु:खे भोगीत आहेत असेत्यांना दिसले तेंव्हा ते लगेच वैकुंठात विष्णुकडे गेले तेथेत्यांनी विष्णुची स्तुती करूण त्यांना प्रसन्नकरूण घेतले नंतर ते म्हणाले आपली कृपा असेल तर पृथ्विवरील सर्व लोकांची दु:खे नाहीशी होतील असा काही उपाय सांगा ते ऐकुण श्रीविष्णु म्हणाले नारदा मी तुझयावर प्रसन्न आहे स्वर्गात किंवा मृत्युलोकात कोणालाही माहीत नसलेले असे पुण्यकारक व्रत मी तुला सांगतो हे व्रत करणारा सर्वकाळ सुखभोगून शेवटी मोक्षपदास जातो हे व्रत दु:खाचा नाश करणारे असून धन धान्य व सौभाग्य व संतती देणारे आहे याला श्रीसत्यनारायणाचे व्रत असे म्हणतात सूर्यास्ता नंतर किंवा केंव्हातरी सत्यनारायणाचे पूजन करावे केळी दुध तूप साखर व रवा हे सर्व सम प्रमाणात सव्वाच्या मापाणे घेवुन त्याचा प्रसाद सत्यनारायणाला अर्पन करावा आपले बंधु बांधव परीवार व मीत्र यांच्यासह श्री सत्यनारायणाची कथा ऐकून तिर्थ प्रसाद घ्यावा नंतर सर्वासह भोजन करावे श्री सत्यनारायणाची पूजा देवळात अगर पवीत्र जागी करावी हे व्रतकेले असता मनुष्याच्या सर्व ईच्छा परीपूर्ण होतात या कलीयुगात सर्व जीवांना दु:ख नाशाचा हाच एक सोपा उपाय आहे हरये नम: हरये नम: हरये नम:



Scanned by CamScanner

।। श्रीसत्यनारायण भगवान की जय ।।

।। श्री सत्यनारायणाची कथा ।।

।। अध्याय दुसरा ।।

भगवंत पुढे सांगतात हे व्रत कोणी केले ती कथा आता ऐका पवीत्र वाराणशी नगरीत एक ब्राम्हण रहात होता दारीद्रयाने त्रासला होतातो रोज भिक्षा मागण्या करीता नगरात हिंडत असे त्याचे दु:ख पाहून एकदा भगवंतानी वृद्ध ब्राम्हणाचे रूप घेतले व ते त्याला म्हणाले ब्राम्हना तुझे दु:ख पाहून मला दया येते तु आता सर्व दु:खाचा नाश करणारे श्री सत्यनारायणाचे व्रत कर असे म्हणून भगवंतानी त्याला व्रताचे सर्वविधान सांगीतले त्याप्रमाने ब्राम्हन दुसरे दिवशी व्रत पूजा करण्याचा निश्चय करूण भिक्षेस निघाला त्यादिवशी त्या ब्राम्हणला खूप भिक्षा मिळाली त्याने पूजेचे सर्व सामान आणुन श्री सत्यनारायणाचे पुजन केले व तिर्थ प्रसाद घेतला त्यामुळे तो दारीद्रयातून मुक्त होवुन पूर्ण सूखी झाला प्रत्येक महीण्याला तो व्रत करू लागला एकदा तो व्रत करीत असता एक मोळीविक्या तहाण लागली म्हणून तेथे आला व्रत कथा चाललेली पाहून तो तिथेच थांबला नंतर तिर्थ प्रसाद घेवुन त्या व्रताची माहीती घेतली व तो आपल्या कामाला गेला दुसरया दिवशी व्रत पूजन करण्याचा निश्चय करूण तो नगरात गेला त्या दिवशी त्याला पुष्कळ द्रव्य मिळाले तेव्हा त्याने सर्वपूजेचे सामान आणून उत्तम प्रकारे ईष्ट बांधवासह श्री सत्यनारायणाची पूजा केली व्रताच्या प्रभावाने तो पृथ्विवर परमसुख पावून शेवटी मोक्षाला गेला

हरये नम: हरये नम: हरये नम:



Scanned by CamScanner

॥ श्रीसत्यनारायण भगवान की जय ॥

॥ श्री सत्यनारायणाची कथा ॥

॥ अध्याय तीसरा ॥

सुत पूढे सांगतात मुनीहो मी आणखी एक व्रत कथा सांगतो ऐका पूर्वी उल्कामुख नावाचा एक राजा होवुन गेला त्याची पत्नी पतीव्रता होती एक दिवस राजा नदीच्या तीरावर व्रत पूजन करीत असता तेथे साधु नावाचा एक वाणी आला ते व्रत पाहून साधु वाण्याने त्याची माहीती विचारली तिर्थ प्रसाद घेतला त्या साधु वाण्याला संतती नसल्यामुळे फार दु:ख होत असे हे व्रत करण्याचा निश्चय करूण तो घरी गेला त्याने आपल्या लीलावती नावाच्या पत्नीला आपण केलेला नवस सांगीतला सत्यनारायणाच्या कृपेने लीलावती गर्भवती राहीली व नवु महीन्यानी तीला एक सुंदर कन्या झाली तीचे नाव कलावती असे त्यांनी ठेवले ती चंद्राच्या कलेप्रमाने दिवसेंदिवस वाढु लागली पण त्या साधुवाण्याला व्रताची आठवण झाली नाही पत्नीने आठवण केल्यावर मुलीच्या लगणाच्या वेळी व्रत पूजन करू असे त्यांनी ठरवीले पुढे मुलगी मोठी झाल्यावर तीचे लग्न कांचन नावाच्या नगरातील एका योग्य वाण्याच्या मुलाबरोबर ठरविले मोठया आनंद पूर्वक साधु वाण्याने तीचे लग्न करून दिले पण त्याला व्रताची आठवन राहीली नाही त्यामुळे भगवान त्याच्यावर रागावले ती कथा ऐका काही दिवसांनी तो साधुवानी व्यापारासाठी जावायासह सिंधु नदीच्या तीरावर असनारया रत्नपूर नगरात गेला तेथे व्यापार करूण काही दिवस सूखात गेल्यावर श्री सत्यनारायणाच्या शापाने त्याला भयंकर दु:ख प्राप्त झाले काही दिवसांनी तेथील चंद्रकेतु राजाच्या वाडयात चोरी झाली व द्रव्य घेवुन चोर पळु लागले राजदुतांनी



Scanned by CamScanner

त्यांचा पाठलाग केल्यामुळे ते घाबरले व शेजारीच असलेल्या साधुवाण्याच्या घरी त्यांनी ते चोरीचे सामान टाकुन दिले पाठीमागुन राजदूत आले त्यांनी वाण्यांनाच चोर म्हणून पकडून जावायासह राजासमोर आणून उभेकेले राजानेही फारसा विचार न करता त्यांना बंदित टाकले ईकडे साधुवाण्याच्या घरीही चोरांनी सर्व लूटून नेले त्यामुळे त्याची बायको व मुलगी त्यांना अतोनात दु:ख होवुन त्या घरोघरी भिक्षा मागत फिरू लागल्या एक दिवस भुकेने व्याकूळ झालेली कलावती एका ब्रांम्हणाच्या घरी गेली तेथे व्रत पुजन चालुहोते तिथे तिर्थ प्रसाद घेवुन तिने आपल्यावर कृपा करण्या करीता सत्यनारायणाची प्रार्थना केली घरी जाउन तिने सर्व हकीकत आपल्या आईला सांगीतली ते ऐकून साधुवाण्याच्या पत्नीला सत्यनारायणाची आठवन होवून तिने सत्यनारायणाचे पूजन केले व हात जोडून ति म्हणाली हे भगवंता पती व जावाई हयांचे अपराध माफ करूण आम्हाला क्षमा करावी श्री सत्यनारायणांनी संतुष्ट होवुन चंद्रकेतु राजाच्या स्वप्नात जावुन सांगीतले राजा जे दोन वाणी तु बंदीत ठेवले आहेस त्यांना सकाळी सोडून दे त्याच प्रमाने त्यांचे सर्व धनही त्यांना परत देवुन टाक त्याच प्रमाने सकाळी राजाने सभेमध्ये ते स्वप्न सांगुन त्या दोन वाण्यांना समोर आणविले व तो त्यांना म्हणाला वैश्यहो तुमच्या दैवयोगाने तुम्हाला पुष्कळ दु:ख भोगावे लागले आता तुम्ही सुखाने आपल्या घरी जा असे सांगुन त्यांना वस्त्रे व अलंकार देवुन त्यांचा गौरव केला त्यांचे सर्व धनही त्यांना परत दिले साधुवाण्याने व त्याच्या जावायाने राजाला नमस्कार केला व आपल्या नगरात जायची ते तयारी करू लागले

हरये नम: हरये नम: हरये नम:



Scanned by CamScanner

|| श्रीसत्यनारायण भगवान की जय ||

|| श्री सत्यनारायणाची कथा ||

|| अध्याय चवथा ||

साधुवाणी सर्वांचा आशिर्वाद घेवून जावायासह स्वतच्या नगरास जाण्यास सिद्ध झाला त्याने नौका ठरवून माल त्यावर भरला तेव्हा त्याची परीक्षा पहाण्या करीता श्री सत्यनारायणांनी संन्याश वेश घेतला व ते साधुवाण्याला म्हणाले हे साधो या नौकेत काय आहे द्रव्याने चढुन गेलेले ते दोन वाणी उपहासहाने त्यांना म्हणाले संन्याशी महाराज आपल्याला द्रव्य पाहीजे म्हणून विचारत आहात काय पण ती आमची नौका फक्त पाला पाचोळयांनी भरलेली आहे ते असत्य भाषन ऐकून भगवान म्हनाले तुझे म्हनने खरे होवो असे म्हनुन भगवान पलीकडे जावून बसले ईकडे साधुवाण्याने पाहीले तो हलकेपणामुळे नौका पाण्याच्यावर जास्त आलेली दिसली त्याबरोबर तो घाबरला आणी नौकेत पाहु लागला तर ती सर्व पाला पाचोळयांनी भरलेली दिसली ते पाहून तो अतीशय शोक करू लागला तेंव्हा त्याचा जावाई म्हणाला महाराज उगीच शोक करीत बसू नका त्या संन्याशाच्या शापा मुळेच हे सर्व झाले आहे आपन त्यालाच शरण जावु जावायाचे बोलने ऐकुन साधुवाणी त्या संन्याशा जवळ गेला व नमस्कार करून आदर पूर्वक म्हणाला महाराज मघाशी मी आपल्याला खोटे बोललो मला क्षमा करा असे म्हणुन साधुवाण्याने त्यांना पुन्हा पुन्हा नमस्कार केला तेंव्हा संन्याश वेशधारी भगवाण म्हणाले तु शोक करू नकोस माझे पूजन विसरलास म्हणून तुला हे दु:ख प्राप्त झाले ते ऐकुन साधुवाणी दीन वाणीने म्हणाला भगवान माझयावर कृपा करा मी तुम्हाला शरण आलो आहे त्यावर प्रसन्न होवुन



Scanned by CamScanner

ईच्छीत वर साधुवाण्याला देवुन भगवान गुप्त झाले नंतर साधुवाणी नौकेवर जावुन बघतो तो नौका द्रव्याने पूर्ण भरलेली दिसली तेंव्हा साधुवाण्याने मित्रांसह व जावायासह श्री सत्यनारायणाची यथासांग पूजा केली नंतर नौका पाण्यात लोटुन तो घरी जाण्यास निघाला त्याच्या नगराच्या जवळ आल्यावर त्याने एक दूत घरी वर्तमान कळविण्या करीता पाठवीला दुताने सांगीतलेले वर्तमान ऐकूण साधुवाण्याची बायको पतीच्या दर्शनासाठी बंदरावर गेली जातांना मुलीला श्रीसत्यनारायणाची पूजा कर असे सांगुन ती घाईने गेली आईने सांगीतल्या प्रमाने कलावतीने व्रतपूजा केली पण ती पतीच्या दर्शनाला उत्सुक झाल्यामुळे तिर्थ प्रसाद न घेता ती तशीच बंदरावर गेली त्यामुळे रागावलेल्या श्रीसत्यनारायण प्रभूने तीचा पती असलेली नौका पाण्यात बुडविली ते पाहून कलावती शोकाने विव्हळ होवुन जमीनीवर पडली भयभीत झालेला साधुवाणी व त्याची पत्नी हा प्रकार पाहून आर्श्चय चकीत होवून अगदी घाबरून गेले कलावती व तीची आई त्यांनी अत्यंत शोक केला व कलावती सती जाण्यास सिद्ध झाली ते पाहून साधुवाणी म्हणाला हे संकट टळेल तर मी श्रीसत्यनारायणाची पूजा करीन ते ऐकुन दीन दयाळु भगवान आकाशवाणीने म्हणाले हे साधो तुझी कन्या तिर्थ प्रसादाचा त्याग करून पती दर्शना साठी आली आहे त्यामुळे हा प्रकार घडला आहे ती घरी जावून तिर्थ प्रसाद घेवून येईल तर तीला तीचा पती नि:संशय प्राप्त होईल ही आकाशवाणी ऐकून कलावती घरीगेली व तिर्थ प्रसाद घेवुन परत बंदरात आली तोच तीचा पती स्वजनांसह तीच्या दृष्टीस पडला मग ते सर्वजन अतीशय आनंदीत होवुन घरी गेले नंतर तो साधुवाणी प्रत्येक पौर्णिमेला व संकातीला श्रीसत्यनारायणाचे पूजन करू लागला या लोकी तो सुखी झाला व शेवटी मोक्षाला गेला

हरये नम हरये नम हरये नम



Scanned by CamScanner

|| श्रीसत्यनारायण भगवान की जय ||

|| श्री सत्यनारायणाची कथा ||

|| अध्याय पाचवा ||

सुत पुढे सांगतात पुर्वी अंगध्वज नावाचा एक राजा होवुन गेला एकदिवस मृगया करून तो परत येत असता वाटेत त्याला एका वडाच्या झाडाजवळ काही गवळी भक्ती भावाने सत्यनारायणाचे पूजन करीत असलेले दिसले परंतु राजा पुढेही गेला नाही व त्याने नमस्कारही केलानाही तरी सुद्धा त्या गवळयांनी राजापुढे सत्यनारायणाचा प्रसाद आणुन ठेवला नंतर त्या गवळयांनी आपुल्या बांधवांसह व मित्रांसह तिर्थ प्रसाद आनंदाने भक्षण केला पण राजाने प्रसादाचा अव्हेर केल्याने तो फार दु:खी झाला त्याचे शंभर मुले व धनधान्य संपत्ती सर्व नाश पावली ही सत्यनारायणाची अवकृपा आहे हे जानून राजा पुन्हा त्या गवळयां जवळ गेला व भक्तीयुक्त अंत: करणाने त्याने सत्यनारायणाचे पूजन केले त्यामुळे अंगध्वज राजा धनपुत्र व ऐश्वर्य संपन्न झाला व या लोकात सुखी होवुन शेवटी सत्यनारायण पुरात गेला जो कोणी अती दुर्लभ असे सत्यनारायणाचे व्रत व पूजन करतो व फल देणारी कथा भक्ती भावाने श्रवण करीतो त्याला सत्यनारायणाच्या प्रसादाने धन धान्य व सर्व वस्तुंचा लाभ होतो दारीद्रयाला धन मिळते बंधनात असेल तो बंधनातून मुक्त होतो भीतीग्रस्त झाला असेल तो भीती पासून मुक्त होतो यात संशय नाही ईच्छीलेले सर्व फल मिळते त्याला सत्यनारायण लोक प्राप्त होतो मुनीहो असे हे सत्यनारायण व्रत तुम्हाला सांगीतले हे व्रत केले असता मनुष्य सर्व दुखातुन मुक्त होतो विशेष करून कलीयुगात सत्यनारायणाची पूजा फल देणारी आहे या सत्यनारायणाला कोणी काल म्हणतात कोणी ईश म्हणतात कोणी सत्यदेव म्हणतात तर कोणी सत्यनारायण म्हणतात याचे



Scanned by CamScanner

जो नित्य पठण करीतो किंवा श्रवण करीतो त्याची सर्व पापे सत्यनारायणाच्या प्रसादाने नाहीशी होतात यात काही संशय नाही हरये नम:हरये नम: हरये नम:

।। श्रीसत्यनारायण भगवान की जय ।।

।। आरती ।।

आरती सत्यदेवा माझा प्राण विसावा
ओवाळु मनोभावे शूध्द कापुर लावा ।।धृ ।।
काशीक्षेत्री प्रगटोनी सत्यनारायण ध्यानी
लाविले जन सारे फल सिध्दी पसरोणी ।।1 ।।
कपटी साधुवाणी तुवा नेला उध्दरोणी
तैसाच मोळीवाला तारीयेला कृपाक्षणी ।।2 ।।
तत्काली फल तूझे ख्याती अशी जगी गाजे
तुकाराम सुत बोले भजा सत्येश्वरा माझे ।।3 ।।



Scanned by CamScanner